महाराष्ट्र टाइम्स
महामुंबई

# युरोपिअन पार्लमेंटमध्येही घुमला मराठी आवाज

प्रवीण मुळ्ये

बीग बी अमिताभ बच्चन, उद्योजक विजय मल्ल्या यांच्या शुभेच्छा घेऊन त्याने युरोपिअन पार्लमेंटमध्ये पाय ठेवला. 'उद्योगजगताची सामाजिक बांधिलकी' या विषयावरील चर्चेत तो सहभागी झाला. दिग्ग्जांसमोर आपले प्रश्न विचारण्यास तो डगमगला नाही. या तरुणाचे नाव आहे, नीलेश राजे! जगासमोर असलेल्या महत्त्वाच्या प्रश्नावर तरुणांची मते जाणून घेण्यासाठी युरोपिअन पार्लमेंटच्या पुढाकाराने झालेल्या 'सीसीएस वर्ल्ड यूथ फोरम २००७' मध्ये या मराठी तरुणाने भारताचा यूथ आयकॉन बनून देशाचे प्रतिनिधित्व केले.

'वर्ल्ड यूथ फोरम'विषयीची माहिती मी वर्तमानपत्रातून वाचली आणि त्याचक्षणी अर्ज करण्याचा निर्णय घेतला. या फोरममध्ये तुम्हाला का सहभागी व्हायचे आहे?, याचे ५०० शब्दांत विवेचन करायचे होते. या मजकुरासह केलेल्या सामाजिक कार्याची माहितीही फोरमला पाठवायची होती. भारतातील हजारो तरुणांसह मी देखील माझे नशीब आजमावण्याचे ठरवले. माझी मते मला युथ आयकॉन बनवतील याची खात्री नव्हती... नीलेश सांगत होता.

नीलेशबरोबर २० हून अधिक देशांतील ५० तरुण आपापल्या देशाचे यूथ आयकॉन बनून फोरममध्ये सहभागी झाले होते. बेल्जिअमची राजधानी ब्रसेल्स येथील युरोपिअन पार्लमेंटमध्ये पहिल्यांदाच या यूथ फोरमचे आयोजन केले होते. उद्योगांचे सामाजिक भान, उद्योगातील नीतिमूल्ये, नेतृत्त्वगुण, उद्योग आणि अध्यात्म या विषयांवर युरोपातील राजकीय मंडळींबरोबरच उद्योजकांचीही मते आम्हाला जाणून घेता आली. तरुणांच्या खांद्यावर असलेल्या जबाबदाऱ्यांची जाणीवही यावेळी झाल्याचे नीलेश राजेने सांगितले. प्रसिद्धीचे सिम्बॉल म्हणून तुम्हाला जेव्हा लोकांना सामोरे जाता तेव्हा कसे वाटते?, हा नीलेशचा प्रश्न युरोपिअन पार्लमेंटमध्ये सर्वांची दाद मिळवून गेला.



नीलेश राजेची यशोगाथा

सांताक्रूझ येथे रहिवासी असलेल्या नीलेश राजेने वालचंद कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगमधून बीई केले. सध्या तो 'सीसटाइम कम्प्युटर सिस्टिम' या कंपनीत नोकरी करतो. तो वेलिंगकर्स इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमधून एमबीएदेखील करीत आहे. वर्ल्ड यूथ फोरममधील आपले अनुभव शाळकरी आणि कॉलेजच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याबरोबरच पुढील यूथ फोरमसाठी मुंबईतील तरुणांची तयारी करण्याचा संकल्प नीलेशने केला आहे.

घरच्यांच्या पाठिंब्याबरोबरच कंपनीचे सीईओ विशाल ग्रोव्हर, एचआर प्रमुख माधव राव, रिपोर्टिंग मॅनेजर अद्वैत वाघमारे आणि इतर सहकाऱ्यांनी दिलेला मानसिक, आर्थिक पाठबळ यामुळेच आपण युरोपिअन पार्लमेंटमध्ये मराठी ठसा उमटवू शकल्याचे नीलेश मान्य करतो.